# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/02/2023 (मंगळवार) दुपार


---

## घरफोडीच्या गुन्हयातील आरोपी जेरबंद
## पोलीस स्टेशन उमरेड ची कारवाई

**पोस्टे उमरेड:—**गुन्हयाची हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी नामे— केशोर गंगाधर भुडे, हे शेतकरी असुन त्यांचे बेसुर येथे जुने घर व शेती आहे. मुलांच्या शिक्षणाकरीता ते उमरेड येथे राहत असुन बेसुर येथे दररोज जाणे येणे करीत असतात. दिनांक २३/०२/२०२३ रोजी चे सायंकाळी ०७.३० वा. नेहमी प्रमाणे बेसुर येथील घराला कुलुप लावुन उमरेड येथे गेले होते व दुसऱ्या दिवशी दिनांक २४/०२/२०२३ रोजी नेहमी प्रमाणे सकाळी १०.०० वा. बेसुर येथील घरी गेले असता त्यांना घराच्या समोरील दरवाज्याचे कुलुप तुटलेले दिसले. कोणीतरी अज्ञात आरोपीने त्यांच्या घराचा ताला तोडुन घरात प्रवेश करून घराच कपाटामध्ये ठेवलेले १) जुनी सोन्याची पोत ०३ तोळयाची किंमती अंदाजे ६०,०००/—रू. २) सोन्याच्या ०४ तोळयाच्या बांगडया किंमती अंदाजे ८०,०००/—रू. ३) सोन्याची ०१ तोळयाची गोफ किंमती अंदाजे २०,०००/—रू. ४) नगदी ६०,०००/—रू. असा एकुण २२,००००/—रूपयाचा मुद्देमाल चोरून घेवुन गेले. अशा फिर्यादीच तोंडी रीपोर्ट वरून पोस्टे उमरेड येथे अप क्र. ११२/२०२३ कलम ४५७, ३८० भादवि चा गुन्हा दाखल केला. फिर्यादीने पुवरनी बयानात सांगीतल्या नुसार पत्नीचे पर्समध्ये असेलेले ८०,०००/—रू. रू. सुद्धा आरोपीने चोरून नेले होते.

तपासा दरम्यान घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. कॅमेराचे फुटेज व तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयात अर्पन राहुल पाटील वय ३५ वर्ष, रा. गोजी ता. जि. वर्धा हा आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्या राहत्या घरून आरोपीस आठ तासाच्या आत अटक करण्यात आली. सदर आरोपीवर यापुर्वी सुद्धा चोरी, घरफोडी सारखे अतिशय गंभीर गुन्हे दाखल असुन तो सराईत गुन्हेगार आहे. आरोपी गुन्हयात चोरी गेलेल्या मुद्देमालाची काहीही माहिती देत नव्हता. व उडवाउडवीचे उत्तरे देवुन तपासात सहकार्य करीत नव्हता. पोलीसांना अतिशय कला व कौशल्याचा वापर करून गुन्हयातील चोरी गेलेला संपुर्ण मुद्देमाल व गुन्हयात वापरलेले साहित्य जप्त केले असुन ते पुढीलप्रमाणे

**जप्त केलेल्या वस्तुचे वर्णन:—** पिवळया रंगाच्या सोन्याच्या दोन बांगडया गोलाकारी किंमती अंदाजे —८०,०००/—रू. पिवळया रंगाची जुनी सोन्याची पोत किंमती अंदाजे ६०,०००/—रू. पिवळया रंगाची जुनी सोन्याची गोफ किंमती अंदाजे २०,०००/—रू., २० रू. च्या नविन कडक चलनी ३३ नोटा एकुण ६६० रू., १०० रू. च्या २५ चलनी नोटा एकुण २५००/—रू., टी. व्ही. एस ज्युपीटर दुचाकी क्र. एम. एच—३२/ए.क्यु.—२६४९ किंमती अंदाजे ८०,०००/—रू. व गुन्हा करतांना वापरलेले ईतर साहित्य असा एकुण २४३,१६०रू. चा मुद्देमाल.

गुन्हयात चोरी गेलेली नगदी रक्कम ही आरोपी याने बॅक खात्यामध्ये जमा केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले अुसन सदर रक्कम ही सुद्धा पुढील कायदेशीर कारवाई करून हस्तगत करण्यात येते. सदर गुन्हयात पोस्टे उमरेडचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने १२ तासाच्या आत आरोपीचा शोध घेवुन आरोपीस अटक केली व तपासा दरम्यान चोरीस गेलेले संपुर्ण सोन्याचे दागिने व रक्कम असा १०० टक्के मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. भिमरावजी टेळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन उमरेड येथील

ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद घोंगे, डी. बी पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे, पोलीस हवालदार प्रदीप चवरे, पोलीस नायक राधेश्याम कांबळे, पंकज बट्टे, पोलीस शिपाई तुषार गजभिये पोस्टे उमरेड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर